MHAU050027912018

नियमीत दिवाणी दावा क्र.४७९/२०१८
निवृत्ती रामचंद्र ताके व इतर
विरुध्द
कडु सखाराम काळे व इतर.

## नि.क्र.४३ वरील आदेश
## (पारीत दि.२८.०७.२०२५)

प्रतिवादी क्र.१ याने सदरचा अर्ज मयत वादी व प्रतिवादी यांचे बाबतीत दिवाणी प्रक्रिया संहिता आज्ञावली २२ प्रमाणे आदेश पारीत होण्यासाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र.१ चे असे कथन आहे की, या दाव्यातील वादी क्र.१ निवृत्ती दिनांक २८.०२.२०२४ रोजी मयत झाला आहे. तसेच प्रतिवादी क्र.२ नामे आसराबाई दिनांक १५.०१.२०२१ रोजी मयत झाली आहे. तर या प्रकरणातील प्रतिवादी क्र.३ जाईबाई दिनांक २७.०२.२०२२ रोजी मयत झाली असुन, प्रतिवादी क्र.४ वेणूबाई दिनांक ०१.०९.२०२१ रोजी मयत झाली आहे. प्रतिवादी क्र.५ रघुनाथ दिनांक २६.०४.२०१९ रोजी मयत झाले आहेत. या प्रकरणातील वादी व प्रतिवादी यांचेमध्ये नियमीत दिवाणी दावा क्र.४१०/२०१५ देखील न्यायप्रविष्ट आहे. त्यात वादींनी मृतकांचे कायदेशीर वारस अभिलेखावर घेतलेले आहेत, परंतु या प्रकरणामध्ये घेतलेले नाही. सबब प्रतिवादी क्र.१ ने मृतक वादी व प्रतिवादी यांचेबाबतीत आदेश पारीत करण्याची मागणी केली आहे.

३. प्रतिवादी क्र.१ चे अर्जावर वादींचे म्हणणे मागविण्यात आले असता, त्यांनी त्यांचे म्हणणे सादर केले नाही. सबब अर्ज त्यांच्या म्हणण्याविना विचाराधीन आहे.

४. अर्ज वाचला, तसेच अभिलेखाचे अवलोकन केले.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र.३ जाईबाई दिनांक २७.०२.२०२२ रोजी मयत झाल्यानंतर त्याबाबतची पुरशीस नि.क्र.४३ वर दाखल करण्यात आली. परंतु आजपर्यंत प्रतिवादी क्र.३ चे कायेदशीर वारस/प्रतिनिधी अभिलेखावर घेण्यात आले नाहीत. या प्रकरणातील प्रतिवादी क्र.४ वेणूबाई दिनांक ०१.०९.२०२१ रोजी मयत झाली, तर प्रतिवादी क्र.५ दिनांक २६.०४.२०१९ रोजी मयत झाले, त्यांच्या मृत्यूची बाब नि.क्र.३५ वरील पुरशीस अन्वये कळविण्यात आली. परंतु

प्रतिवादी क्र.४ व ५ यांचे कायदेशीर वारस/प्रतिनिधी आजपर्यंत अभिलेखावर घेण्यात आलेले नाहीत. त्यांचे कायदेशीर वारस अभिलेखावर का घेण्यात आलेले नाहीत, याचा वादींनी कोणताही खुलासा केलेला नाही. प्रतिवादी क्र.३ ते ५ मयत झाल्यानंतर त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेण्याचा विहित कायदेशीर कालावधी संपुन गेलेला आहे. अशा परिस्थितीत, प्रस्तुत दावा त्यांचे विरुध्द प्रलंबित ठेवता येणार नाही. परंतु प्रतिवादी क्र.१ च्या अर्जावर आदेश पारीत न करता, याबाबत नि.क्र.१ वर आदेश पारीत करणे योग्य व आवश्यक राहील. सबब पुढील आदेशः

## आदेश

१. अर्ज (नि.क्र.४३) निकाली काढण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ याने नि.क्र.१ वरील आदेशाची नोंद घ्यावी.

Digitally signed by AYYUB BABU SHAIKH
Date: 2025.07.29 13:25:45 +0530

**( ए. बी. शेख )**

दि.२८.०७.२०२५ २रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,

वैजापुर.

**प्रमाणपत्र**

मी अधिकथन करतो की, पीडीएफ करुन अपलोड केलेल्या आदेशामधील शब्द–नि–शब्द हे मुळ आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाखे नावः– अनंत वि. चोपडे,

न्यायालयाचे नावः– (श्री. ए.बी. शेख) २रे सह दिवाणी न्यायालय, व.स्तर, वैजापुर

आदेश दिनांकः– २८–०७–२०२५

आदेशावर पिठासीन अधिकारी
यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांकः– २९–०७–२०२५

आदेश अपलोड केल्याचा दिनांकः– २९–०७–२०२५

..........................................................................